माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे १२६७१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी पूर्वतयारी...

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि २०१९/प्र.क्र. १३/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९/११/२०१९

प्रति,
जिल्हाधिकारी *(सर्व)*,
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय:- माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे १२६५५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी पूर्वतयारी...**

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. **माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित झालेल्या सुमारे १२६५५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका टप्प्याटप्प्याने घेणे आवश्यक आहे.**

२. इतर निवडणुकांपेक्षा ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे काही वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

(i) ग्रामपंचायती विखुरलेल्या असतात.

(ii) निवडणूक निर्णय अधिकारी बहुतांशी वर्ग-३ चे अधिकारी (वर्ग-१ चे नव्हे) असतात. (उदा. ग्रामविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, अव्वल कारकून इ.)

(iii) प्रत्येक जिल्हयामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची संख्या इतर निवडणुकांपेक्षा खुप मोठ्या प्रमाणात असते. ( जिल्हयामध्ये सुमारे ३५० ते ४०० ग्रामपंचायतींच्या निवडणुका असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी देखील तेवढयाच संख्येने आवश्यक असतात).

(iv) शासनाने महाराष्ट्र अधिनियम क्र.५४, दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा केलेली आहे. यानुसार ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रत्येक मतदारास ३ किंवा ४ मते द्यावी लागतील.

२.१ शासन परिपत्रक क्रमांक-संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२८/ई-१अ, दिनांक २४ एप्रिल, २०१७ अन्वये ग्रामपंचायत निवडणुकांची सर्व जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. ही जबाबदारी इतर दुसऱ्या कोणालाही पुन:प्रदान करता येणार नाही.

२.२ उपरोक्त बाबी विचारात घेऊन **प्रभागरचना, मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन तसेच प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम या निवडणूकीच्या टप्प्यांच्या पूर्वतयारीच्या** अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना / आदेश देण्यात येत आहेत :-

(i) **ग्रामपंचायतींच्या हद्दींमध्ये बदल न करणे** :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का०५, दिनांक २७ जानेवारी,२००५ व दिनांक ३० जुलै,२०१८ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा माहिने अगोदरच्या कालावधीमध्ये, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल न करणे.

(ii) **प्रभाग रचनेबाबत :- आयोगाच्या दिनांक २९/११/२०१९ च्या आदेशान्वये** माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या **सुमारे १२६५५ ग्रामपंचायतींसाठी** प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम देण्यात आला आहे.

(iii) **मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाबाबत** :- माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत **सुमारे १२६५५ ग्रामपंचायतींची** मुदत संपत आहे. ग्रामपंचायतींची एकूण संख्या विचारात घेता टप्प्याटप्प्याने निवडणूका घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार मतदार यादी ग्राहय धरण्याच्या **दिनांकाबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.**

(iv) **मतदार यादी कार्यक्रमाबाबत** :- माहे जुलै २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत ग्रामपंचायतींची संख्या (**सुमारे १२६५५**) विचारात घेता सविस्तर मतदार यादी कार्यक्रम टप्प्याटप्प्याने देण्यात येईल.

२.३ या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी व त्यांचे नोडल अधिकारी यांच्याबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका घेऊन आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात येतात. तरी वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसाठी जिल्हाधिकारी व त्यांचे नोडल अधिकारी यांनी उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी. जे अधिकारी उपस्थित राहणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

३. आता निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत. प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम आयोगाकडून स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येईल.

## आ दे श

३.१ उपरोक्त निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी दक्षता व काळजी घेण्यात येते, ती सर्व दक्षता व काळजी या निवडणुकांमध्येदेखील घेणे बंधनकारक आहे. तरी संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे.

३.२ संबंधित विभागीय आयुक्त यांच्यावर या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये पर्यवेक्षण, नियंत्रण ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी राहील. त्यांनी सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून वेळोवेळी निवडणुकीतील मुद्दयांबाबत आढावा घ्यावा.

३.३ या निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(अ) अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत :-**

(i) **ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आवश्यक असलेले निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, इ. उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे. आगामी काळातील निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींची संख्या विचारात घेता निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची मोठया प्रमाणावर आवश्यकता आहे. त्यामुळे संभाव्य निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूका करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.**

(ii) जिल्हयामध्ये जर अधिकारी/कर्मचारी यांची कमतरता भासत असेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांच्याशी चर्चा करून अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून घ्यावेत.

(iii) शक्यतो एका ग्रामपंचायतीकरीता १ निवडणूक निर्णय अधिकारी नेमावा. हे करताना योग्य सचोटी असलेला व राजकीय पक्षांशी संबंध नसलेला अधिकारी नेमावा.

मात्र, एका ग्रामपंचायतीकरीता १ निवडणूक निर्णय अधिकारी नेमणे शक्य नसेल तर भौगोलिक सलगता व त्यांची सदस्य संख्या विचारात घेऊन २ किंवा ३ ग्रामपंचायतींकरीता १ याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. उदा. सरपंचासह एकूण सदस्य संख्या १२, १४, १६ व १८ असलेल्या मोठ्या ग्रामपंचायतींकरीता प्रत्येकी एक निवडणूक निर्णय अधिकारी, तर सरपंचासह एकूण सदस्य संख्या ८ व १० असलेल्या दोन ग्रामपंचायतींकरीता एक निवडणूक निर्णय अधिकारी नेमण्यात यावा.

(iv) जिल्हयातील मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन पुरेसे अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्त्या करव्यात. तसेच किमान १० टक्के अधिक कर्मचारीवृंद नेमण्यात येईल याची काळजी घ्यावी.

(v) पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस कर्मचारीवृंद नियुक्त करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.

(vi) निवडणुकीचे काम करण्यासाठी आवश्यक ते अधिकारी/कर्मचारी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३,दिनांक ०२ मार्च, १९९५ व दिनांक १८ जुलै, २०१८ अन्वये अधिग्रहित करण्यात यावेत.

(vii) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Disciplinary Action with Suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. तरी आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी यांनी आयोगाचे आदेश क्र-रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दिनांक ०२ ऑगस्ट, २००६ लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**(ब)अधिकारी /कर्मचारी यांच्या प्रशिक्षणबाबत :-**

ग्रामपंचायत निवडणूकीचे कामकाज हाताळणारे निवडणूक निर्णय अधिकारी हे बहुतांश वर्ग ३ चे असतात. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करताना, त्यांना निवडणूक कायदयातील तरतुदींची तोंड ओळख, प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया, आयोगाने पारित केलेले महत्वाचे आदेश याची माहिती असणे आवश्यक आहे. त्यांनी स्थानिक राजकीय पक्ष/उमेदवार/मंत्री/पदाधिकारी यांच्या दबावाखाली काम न करण्यासाठी त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे तसेच त्यांना नियमाप्रमाणे काम करण्यासाठी सर्व प्रकारे प्रोत्साहित करावे.

सन २०१५ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसाठी मतदार यादीचे विभाजन तसेच नामनिर्देशनाची प्रक्रिया संगणक प्रणाली व्दारे करण्यात येते. संगणक प्रणाली हाताळताना या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना अद्याप देखील तांत्रिक अडचणी येतात. या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी सदर संगणक प्रणाली सुलभरितीने हाताळणाऱ्या तालुका स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांची मास्टर ट्रेनर म्हणून नेमणूक करावी. या मास्टर ट्रेनर्सनी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया हाताळणाऱ्या संभाव्य निवडणूक निर्णय अधिकारी यांना आगाऊ स्वरुपात संगणक प्रणालीचे

प्रशिक्षण द्यावे. त्यांचे कमीत कमी ३-४ प्रशिक्षणवर्ग आयोजित करून त्यामध्ये सखोल प्रशिक्षण द्यावे. या प्रशिक्षण वर्गात त्यांना येणाऱ्या अडचणींचे निरसन करावे.

निवडणूक निर्णय अधिकारी यांची मोठी संख्या लक्षात घेता जिल्हाधिकारी यांनी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणासाठी संबंधित तहसिलदार यांना जबाबदारी द्यावी.

**प्रशिक्षणाच्या बाबी :-**

- बहुसदस्यीय प्रभागांमध्ये करावयाच्या मतदानाबाबत
- नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र संगणकीकृत पध्दतीने भरण्याबाबत - नामनिर्देशन पत्र व घोषणापत्र संगणक प्रणालीतून भरताना येणा-या तांत्रिक अडचणी उद्भवू नये म्हणून जिल्हास्तरावर मास्टर ट्रेनर्सची नेमणूक करावी. तसेच मदत कक्षाची स्थापना करावी.
- आयोगास विविध टप्प्यांवर द्यावयाच्या अहवालाची पध्दती (संगणकीय प्रणाली, व्हॉट्स ॲप व शक्य असेल तेथे ट्रू व्होटर चा वापर, इत्यादी)
- आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणीबाबत.
- ग्रामविकास विभागाने सप्टेंबर-२०१७ रोजी जारी केलेल्या पत्रकात नमूद केलेल्या निर्देशांचे (उदा. ग्रामपंचायत निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायत निधीतून नवीन कामे हाती न घेणे तसेच ग्रामपंचायतीची मुदत समाप्त होणाच्या तीन महिने आधी जुनी इतिवृत्त पुस्तिका बंद करणे, इत्यादी) उमेदवारांकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी. आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना.
- उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब विहीत मुदतीत व विहीत पध्दतीने देण्यासाठी त्यांना लेखी सूचित करणे.
- एकापेक्षा अधिक पदावर उमेदवार निवडून आल्यास एक सोडून इतर पदांचा राजीनामा ७ दिवसाच्या आत सादर करण्याबाबत प्रत्येक उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून लेखी सूचित करणे.
- पेड न्यूज, पेड सोशल कमेंट, सोशल मिडिया, इत्यादींवर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना.
- आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

- मतदान केंद्राध्यक्ष व इतर अधिकाऱ्यांसह सर्वांना मतदान यंत्र हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण तसेच या प्रशिक्षणाच्या वेळी आचारसंहितेबाबत उपस्थित होणारे मुद्दे कशा पध्दतीने हाताळावेत याबाबत मार्गदर्शन करावे. उदा. फ्लेक्स बोर्ड, प्रचार सभेची परवानगी इ. परवानग्या बाबतची कार्यपध्दती समजावणे.

**(क) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय**

निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींची मोठी संख्या लक्षात घेता सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या बसण्याची व्यवस्था आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०१७/स्था.आ./प्र.क्र.५/का-८, दिनांक ०१ जून, २०१७ प्रमाणे शक्यतो तहसिल कार्यालयातच करण्यात यावी. तहसिल कार्यालयामध्ये बसणे शक्य नसेल तर त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी घेऊन इतरत्र व्यवस्था करावी. मात्र, या ठिकाणी संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील.

**(ड) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व इतर साहित्याबाबत :-**

(i) प्रत्येक मतदारास ३ किंवा ४ मते द्यावी लागणार असल्याने जिल्हाधिकारी यांनी प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर मतदान केंद्रांच्या संख्येचा अंदाजित आढावा घेण्यात यावा. **आपल्याकडे उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या माहितीसह निवडणुकीसाठी आवश्यक मतदान यंत्रांची संख्या व त्यासाठी लागणारे इतर साहित्य इ. बाबतची माहिती आयोगास ई-मेल व्दारे पाठविण्यात यावी. जेणेकरुन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व इतर साहित्याची व्यवस्था वेळेत करण्यात येईल.** तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुरक्षिततेसाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का-५, दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. **तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य आहेत किंवा कसे, याचीही आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.**

(iii) संबंधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना पितळी सील पुरवावेत.

(ई) मतदान केंद्रांबाबत :-

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दि. २७ मे,२०१५ च्या आदेशातील सुचनांनुसार एका मतदान केंद्रास जोडणाऱ्या मतदारांची संख्या सामान्यत: ८०० हून अधिक असू नये. या आदेशातील मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक ती मतदान केंद्रे निश्चित करण्यात यावीत.

(ii) संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची यादी निश्चित करून त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

(iii) मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून सदर मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोयी-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत, इत्यादी सुविधा असल्याबाबत खात्री करावी.

(iv) आयोगाच्या क्र. - रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.०७, दिनांक २५/०१/२०१७ च्या पत्रामध्ये दिलेल्या सुचनेनुसार मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र. ७८/२०१४ मध्ये दिनांक ०९/०२/२०१७ रोजी दिलेल्या आदेशात असे नमूद केले आहे की, आयोगाच्या दिनांक २५/०१/२०१७ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सुविधा पुरविल्या न गेल्यास निवडणुक आयुक्तांविरुध्द न्यायालय योग्य ती कारवाई करेल. तरी आयोगाच्या दिनांक २५/०१/२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना देण्यात याव्यात. तसेच यामध्ये काही त्रुटी राहिल्यास त्यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

(v) आपल्या जिल्हयात आदर्श मतदान केंद्र तयार करण्याकामी नाविन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात व शक्यतो सर्व मतदान केंद्र ही त्या धर्तीवर आर्दश तयार करण्यात यावीत.

(vi) नामनिर्देशनासह निवडणुकीची सर्व प्रक्रिया ही संगणकाच्या माध्यमातून होणार असल्याने कोणत्याही कारणास्तव निवडणुकीच्या कालावधीत संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीस कळविण्यात यावे याची खबरदारी घ्यावी.

(फ) **मतमोजणी :-**

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक २१ डिसेंबर, २००९ व दिनांक २९ मार्च, २०१० नुसार कार्यवाही करण्यात यावी. मतमोजणीच्यावेळी अनावश्यक गर्दी / गोंधळ होणार नाही, यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीत मतमोजणीची आकडेवारी भरणे आवश्यक असून, संगणक प्रणालीतूनच तयार होणाऱ्या विजयी उमेदवाराच्या प्रमाणपत्राची प्रिंट-आऊट काढल्यानंतरच निकाल घोषित करावा व प्रमाणपत्र सही करून वितरण करावे. तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांनादेखील याच संगणकप्रणालीचा वापर करुन संबंधित जागेवर निवडून आल्याचे प्रमाणपत्र देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

४. **नामनिर्देशनपत्र, घोषणापत्र, इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत :-**

४.१ उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(i) नामनिर्देशनपत्र

(ii) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे घोषणापत्र

(iii) आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती, व

(iv) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केल्याची पावती व हमीपत्र)

४.२ राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या दोन बाबींकरिता म्हणजेच उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेब साईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी करून (Register) घ्यावी व नामनिर्देशनपत्र तसेच घोषणापत्रामध्ये माहिती भरावी.

(सदरची माहिती संरक्षित करून ठेवता येऊ शकते). आवश्यक असल्यास दुरुस्ती करून) त्याचे प्रिंट आऊट काढून त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

४.३ सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र, इत्यादी भरण्यात अडचण येऊ नये म्हणून तहसिलदार / निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना संगणकप्रणालीचे योग्य ते प्रशिक्षण द्यावे. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाला पुरविण्यात आलेल्या पोलीस सुरक्षा व्यवस्थेमुळे इच्छुक उमेदवारांना मदत कक्षात जाण्यास अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच जिल्हयातील सेतू, ई-सेवा केंद्र, संग्राम कक्ष इत्यादी जास्त क्षमतेची इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी तसेच सायबर कॅफे व सीएफसी (Community Facilitation Centre) इत्यादी ठिकाणी नामनिर्देशनपत्र भरण्याची सोय उपलब्ध ठेवावी.

४.४ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे घोषणापत्र संगणकाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नमुन्यात भरून त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वत:ची स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे.

४.५ राखीव प्रभागातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतुद आहे. (सन १९५९ चा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम क्र. १०-१क यासंबंधात अधिनियम क्र.६६, दिनांक १४ डिसेंबर, २०१८) यासंदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र घेण्यात यावे.

४.६ आवश्यक ती प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र याकरिताचे हमीपत्र ही कागदपत्रे स्कॅन (SCAN) करून ती अपलोड किंवा संगणकाच्या मदतीने भरू नयेत.

४.७ उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरिता असलेल्या माहिती पुस्तिकेतील विहित नमुन्यात घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलद्वारे देता येणार नाहीत.

४.८ नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्राचा नमुना खालील नमूद वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला आहे :-

http://panchayatelection.maharashtra.gov.in या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास आयोगाशी दूरध्वनी व ई-मेल वर संपर्क साधावा.

५. **नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या घोषणापत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास :-** आयोगाच्या क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८, दिनांक ३०/९/२०१५ च्या पत्रातील निर्देशानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उपरोक्त बाब उमेदवारांच्या निदर्शनास आणून द्यावी.

६. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-**

नामनिर्देशनपत्र भरण्याच्यावेळी अनेक उमेदवारांनी अर्ज भरुनदेखील एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवार ज्यावेळी अर्ज मागे घेतात, त्यावेळी सदर उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे असे प्रसंग घडल्यास आयोगास सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्रमांक - रानिआ / मनपा-२००४/ प्र.क्र.३७/का-५, दिनांक २३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

७. **निवडणूक चिन्ह वाटपाबाबत :-** ग्रामपंचायत निवडणूकीत सरपंच पदासह सदस्य पदाच्या उमेदवारांसाठी चिन्ह वाटपाबाबतचे सुधारीत आदेश दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले असून त्यामधील सुचनांचे पालन करावे.

## ८. आचारसंहिता

- **आचारसंहिता कालावधी** - राज्य निवडणूक आयोग ज्यावेळी निवडणूकीचा कार्यक्रम घोषित करेल त्यावेळेपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल जाहिर होईपर्यंत अंमलात राहील.

- **आचारसंहिता लागू क्षेत्र** -

  अ) ज्या जिल्हयामध्ये ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत, त्या संपूर्ण जिल्हयामध्ये आचारसंहिता लागू राहील.

  ब) ज्या तालुक्यात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका आहेत, त्या संपूर्ण तालुक्यात आचारसंहिता लागू राहील.

  क) निवडणुका असलेल्या ग्रामपंचायतींच्या सीमेलगतच्या गावांमध्येसुध्दा आचारसंहिता लागू राहील.

- **आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी :-**

प्रभाग रचना, मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन व प्रत्यक्ष निवडणूक हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणूकांचे मुख्य ३ टप्पे आहेत. निवडणुकांची आचारसंहिता ही प्रत्यक्ष निवडणुकांचा कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर लागू होत असल्यामुळे, निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्यानंतरच पोलिस विभाग, उत्पादन शुल्क विभाग व इतर संबंधित विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. निवडणूक कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर प्रतिबंधात्मक कारवाईची प्रक्रिया सुरु केल्यास मतदानाच्या दिनांकापर्यंत अशा प्रकरणांना अंतिम स्वरुप दिले जाणे शक्य होत नाही. परिणामी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यामागील उद्देश सफल होत नाही. ही बाब विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(अ) प्रलंबित वॉरंट/समन्स बजावून कायद्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

(ब) दारुबंदी अधिनियमान्वये कार्यवाही करणे.

(क) पुर्वीच्या प्रलंबित गुन्हयांचा /दाव्यांचा पाठपुरावा करणे.

(i) रेल्वे, वन विभाग इ. विभागांशी समन्वय साधून पैशाशी व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक व अन्य संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवणे.

(ii) सहकारी बँका, पतसंस्था इ. मधून होणाऱ्या मोठया प्रमाणातील आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

आदर्श आचारसंहिता जरी संपूर्ण जिल्हा/तालुका/ लगतच्या गावामध्ये लागू असली, तरी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये निवडणुका नसतील, त्याठिकाणी विकासाच्या विविध कामांवर कसलाही निर्बंध राहणार नाही. मात्र या क्षेत्रात अशी कोणतीही कृती करता येणार नाही, ज्यामुळे निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या मतदारांवर विपरीत प्रभाव पडेल.

आदर्श आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाने दिनांक १४/१०/२०१६, दिनांक ०६/०९/२०१७ व दिनांक ३१/०७/२०१८ रोजी आदेश निर्गमित केलेले असून या मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा.

निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायती विखुरलेल्या असल्याने आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी सर्व नाविन्यपूर्ण उपाययोजना जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात.

**९. खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपायोग टाळणे व मतदारांवर प्रभाग टाकण्यासाठी वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवणे :-**

९.१ निवडणुकीसाठी आचारसंहिता कालावधीत मतदारांना प्रभावित करण्याकरिता तसेच प्रलोभन देण्यासाठी उमेदवारांकडून नवनवीन योजना राबविण्यात येतात. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या विविध निकालांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेबाबत काही उपाययोजना करण्यात येतात. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दक्षता घेण्यात यावी.

आदर्श आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाने दिनांक १४/१०/२०१६ व दिनांक ०६/०९/२०१७ रोजी आदेश निर्गमित केलेले असून या मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची दक्षता घ्यावी.

९.२ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६, दिनांक ०६ मे, २०१० अन्वये ग्रामपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या

उमदेवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून सदरचे अधिकार प्रदानाबाबत व संबंधितांना अनर्ह करण्यासंदर्भात करावयाच्या तातडीच्या कार्यवाहीबाबत आयोगाने अनुक्रमे क्र. रानिआ/जिपपंस२०१०/प्र.क्र.९/का.७,दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० व क्र. रानिआ/नप-२०१५/ प्र.क्र.१०/ का-६,दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी आदेश पारित केलेले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का.०८, दिनांक २१/०८/२०१७ च्या आदेशान्वये उमेदवारांने करावयाच्या खर्चाची मर्यादा विहित केली असून क्र. रानिआ/२०१६/उखनि/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दिनांक १५/१०/२०१६ च्या आदेशामध्ये उमेदवारांना निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी वेळ (Time) व रीत (Manner) केलेले आहेत. त्याबाबतचे सूचना फलक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाबाहेर लावून सर्व उमेदवारांना माहिती मिळेल याची दक्षता घ्यावी.

**१०. महिला सक्षमीकरण :-**

१०.१ ग्रामपंचायतींमध्ये एकूण सदस्य संख्येच्या किमान ५०% जागा महिलांसाठी आरक्षित असल्याने या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त सक्षम व योग्य महिला उमेदवारांना निवडणूक लढविण्याबाबत प्रवृत्त करावे. यासाठी आयोगाने क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२/का-८, दिनांक १६ जून, २०१७ च्या पत्रान्वये खालील सूचना दिलेल्या आहेत :-

(i) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) या विभागाकडून तयार करण्यात आलेले बॅनर्स व भित्तीचित्रांचे नमुने कमीत कमी ६x४ च्या आकारात तयार करून सकृतदर्शनी दिसेल अशा ठिकाणी प्रसिध्द करणे.

(ii) सदर नमुन्याचे निवडणुका लागलेल्या ग्रामपंचायतींमधील प्रत्येक गावात कमीत कमी २ बॅनर्स व २ भित्तीचित्रे लावणे.

१०.२ वरील बाबतीत आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना त्यांच्या मंजूर अनुदानातून खर्च भागविण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

११. **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

(i) मतदानाची टक्केवारी वाढविण्याबरोबरच Ethical Voting म्हणजेच निवडणुकीमधील नैतिकता वाढविण्याद्दष्टीने राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांची मदत घेऊन (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, बँका, हॉटेल्स, आठवडी बाजार, शाळा, इत्यादी) मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा. उदा. पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मिडीया, इत्यादी.

१२. **निवडणूक निरीक्षक :-**

संविधानाच्या अपेक्षेप्रमाणे ग्रामपंचायत निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक पध्दतीने होत आहेत किंवा कसे, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०४ डिसेंबर, २०१५ च्या आदेशानुसार **ज्या जिल्हयामध्ये १०० पेक्षा जास्त ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिका आहेत अशा जिल्हयांमध्ये विभागीय आयुक्त यांनी निवडणूक निरीक्षक म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गाशी समकक्ष अधिकाऱ्यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक करावी तसेच ज्या जिल्हयांमध्ये १०० पेक्षा कमी ग्रामपंचायतींच्या निवडणुका आहेत त्याठिकाणी संबंधित उपविभागीय अधिकारी यांची निवडणूक निरीक्षक म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांनी परस्पर नेमणूक करावी.** तसेच निवडणूका पार पाडल्यानंतर संबंधित निवडणूक निरीक्षकांचे विहित नमुन्यातील अहवाल जिल्हाधिकारी मार्फत आयोगाकडे सादर करावेत.

१३. **मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये मतदारांना फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे. यासाठी संगणकीकृत मतदार यादी करताना व्होटर स्लीप तयार करावी. ग्रामपंचायतीतील सर्व मतदारांना १००% व्होटर स्लीपचे वाटप मतदानाच्या तारखेपूर्वी निश्चितपणे होईल याची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

१४. **निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत :-**

(i) राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या निवडणूक कार्यक्रम देण्यात येईल. त्यानंतर आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस काटेकोरपणे पार पाडावेत.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०१ डिसेंबर, २००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्रांचा ताबा घेणे, मतदान यंत्रांवर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करू देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी. यासंदर्भातील आयोगाचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१६ चे आदेश पहावेत.

१५. **निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत :-**

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधित अधिनियम / निवडणूक नियमातील तरतुदीनुसार सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

१६. **इतर :-**

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

".... The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party, howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party, howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be able to secure an advantage over others by virtue of its superior financial strength...

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions... The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country..."

(ii) हे सर्व लक्षात घेता सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडीत सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कोणत्याही उमेदवाराची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या उमेदवाराबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(iii) याकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

**१७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे जिल्हाधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी - यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-**

अ) श्री. एल. आर. शिवराम गौडा व इतर विरुध्द टी. एम. चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र. ४२७२/१९९१ - "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत..."

ब) श्री. एम. एस. गिल रिट याचिका १२९७/१९७७ - उद्भवलेली अनपेक्षीत परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेशा" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार. (आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र.१०/सं.क, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१६)

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ६०६/१९९३ भारत सरकार विरुध्द एम. एस. गिल याप्रकरणी दिनांक २१ सप्टेंबर, २००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दिनांक ०२ ऑगस्ट, २००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र. ०४/२००१/जेएस-२, दिनांक ०७ फेब्रुवारी, २००१)

१८. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक :-

१८.१ राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येणारे निर्देश तसेच पत्रव्यवहार हा sec.mh@gov.in या ई-मेल आयडी वरुनच करण्यात येतो. हे लक्षात घेवून सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांतील ग्रामपंचायत निवडणूक शाखांनी आपले ई-मेल आयडी "gov.in" या Extension चा वापर करून नव्याने तयार करण्यात यावेत, जेणेकरून सर्व ई-मेल संदेश आपणास तातडीने प्राप्त होतील.

१८.२ तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.
दूरध्वीन क्रमांक :- ०२२-२२८८६९५०/२२८४६७२०/२२०२७७३७/२२०४५०७५
ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार,

आपला,

(अतुल जाधव)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२)अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते कि, संबंधित पोलीस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलीस दल उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात.
३) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-३३, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
४) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) विभागीय आयुक्त (सर्व).
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) पोलीस अधिक्षक, ग्रामीण (सर्व).
९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
त्यांना कळविण्यात येते कि, निवडणुकीच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांना आवश्यक साधनसामग्री विनाविलंब पुरवावी.
१०)अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. प्रकाशगड, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
११)सहायक आयुक्त, संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.
त्यांना कळविण्यात येते कि, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून ई. व्हि. एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग व मार्कर पेनची मागणी प्राप्त करून घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

१२) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.
१३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.
१४) निवड नस्ती (कार्या-८).